<u>जाहीर सूचना</u>

दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेसाठी विधी पॅनलवर कनिष्ठ व वरिष्ठ वकील व सिनियर काउंसिल (वरिष्ठ विधिज्ञ) यांची तीन वर्षांकरीता नेमणूक करणेबाबत

दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या वतीने न्यायालयीन कामकाज करणे करीता मा. न्यायालय / न्यायाधिकरण निहाय कनिष्ठ व वरिष्ठ वकील व सिनियर काउंसिल (वरिष्ठ विधिज्ञ) यांची दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या विधी पॅनलवर तीन वर्षांकरीता नेमणूक करावयाची आहे.

त्यादृष्टीने इच्छुक वकील/वरिष्ठ विधिज्ञ वकील संस्था यांचेकडून दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, राज्य व्यवस्थापन कक्ष, तळ मजला, ग्राम विकास भवन,सेक्टर -२१, खारघर, नवी मुंबई, पिन कोड- ४१०२१० येथे जाहिरात प्रसिद्ध झालेच्या तारीखे पासून ०७ दिवसात सकाळी ११.०० ते सायं. ०५:०० वाजेपर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळता) विहित नमुन्यातील अर्ज (संपूर्ण तपशिल व कागदपत्रांसहित) मुलाखतअंती निवड करण्यास्तव मागविणेत येत आहेत. **<u>विलंबाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घेण्यात यावी.</u>**

दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या वतीने करावयाचे न्यायालयीन कामकाजासाठी ठरविलेले दर, अटी-शर्ती व अर्जाचा नमुना दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या (https://www.ddugkymaharashtra.in/) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुक वकील/वरिष्ठ विधिज्ञ/वकील संस्था यांनी दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली सदर दरसूची, अटी-शर्ती व अर्जाचा नमुना यांची प्रिंटआउट काढुन सदर अर्ज, दरसूची व अटी-शर्ती मान्य असलेबाबत स्वाक्षरी करून अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

प्र.क्र.:- ४०४
दिनांक:- ०२/०६/२०२३

सही/-
मुख्य परिचालन अधिकारी
दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना

<u>शैक्षणिक अर्हता व कामाचा अनुभव:</u>

१. अभियोक्ता मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा.

२. अभियोक्ता ऑल इंडिया बार काऊंसिल आणि बार कौंसिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा चा सनदधारक असावा.

३. कनिष्ठ अभियोक्त्यास किमान २ -१० वर्षांपेक्षा जास्त स्वतंत्र न्यायालयीन कामाचा अनुभव असावा त्याबाबतचे वरिष्ठ विधिज्ञ किंवा संस्था यांचेकडून प्रमाणित अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

४. वरीष्ठ अभियोक्त्यास किमान १० -१५ वर्षांपेक्षा जास्त स्वतंत्र न्यायालयीन कामाचा तसेच शासकीय कामाचा अनुभव असावा त्याबाबतचे वरिष्ठ विधिज्ञ किंवा संस्था यांचेकडून प्रमाणित अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

५. अभियोक्त्यास फौजदारी व दिवाणी न्यायालयाच्या कार्यपद्धतीचे उत्तम ज्ञान व अनुभव असणे आवश्यक आहे; त्याबाबतचे वरिष्ठ विधिज्ञ किंवा संस्था यांचेकडून प्रमाणित अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

६. अभियोक्त्यास मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

७. नागरी प्रक्रिया संहिता 1908, फौजदारी प्रक्रिया संहिता 1973, व्यावसायिक न्यायालय कायदा 2015, लवाद आणि सामंजस्य अधिनियम 1996, महसूल वसुली कायदा 1890, ग्राहक संरक्षण अधिनियम, कंपनी अधिनियम 2013, बँकिंग नियमन कायदा 1949, अभियोक्त्यास कामगार कायदा, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम व व इतर लागू असलेले क़ायदे"महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम तसेच शासनातील इतर अन्य योजना संबंधित कायद्यांचे व नियमांचे उत्तम ज्ञान व सदर बाबतीतील कामाचा अनुभव असल्यास विशेष प्राधान्य देण्यात येईल.

<u>पॅनलवरील वकीलांना कराव्या लागणाऱ्या कामासंदर्भातील अटी व शर्ती:</u>

१.पॅनलवरील वकीलाना दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या वतीने वा दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या विरुद्ध न्यायालयामध्ये दाखल करणेत आलेल्या दाव्यांचे, फौजदारी केसेस, अपिले यामध्ये दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्यातर्फे कामकाज पाहणे.

२. विहित मुदतीत दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्यातर्फे दाखल दावा अथवा केसेसमध्ये वकीलपत्र, लेखी कैफियत, जबाब, प्रतिज्ञापत्र,कॅव्हेट दाखल करणे, तसेच संबंधित वेळोवेळी सोपविण्यात येणारी इतर न्यायालयीन कामे करणे.

३. दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या पॅनलवर निवड झालेल्या वकीलांना वर्ग करणेत आलेली प्रकरणे/दावे/खटले त्यांनी स्वतः चालवायचे आहेत. सदर प्रकरणे/दावे/खटले त्यांना अन्य वकीलांना परस्पर वर्ग करता येणार नाही.

४ . दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेचे प्रकरणे वर्ग करणेकरता कनिष्ठ अथवा वरिष्ठ याबाबत तसेच, त्याअंतर्गत पॅनलवर निवड झालेल्या वकीलांमधून करावयाची निवड ह्याबाबत संपुर्ण अधिकार मुख्य परिचालन अधिकारी यांचे राहतील.

५ . दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या संबंधित विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रकरणांवर विधीमत देणे.

६ . न्यायालयीन प्रकरणांच्या व्यतिरिक्त करार, निविदा इ. बाबत मसुदालेखन करणे.

७. मा. न्यायालयात दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या संबंधित दाखल प्रकरणे/दावे/खटले यांसंदर्भात पॅनलवरील वकीलांनी अतिशय गोपनियता बाळगणे आवश्यक आहे व त्याबाबतची लेखी हमी देणे. अन्यथा नियमांचे उलंघन केल्याचे निदर्शनास आल्यास सदर वकीलाची पॅनलवरील नेमणूक रद्द होणेस पात्र राहील.

८. दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे पॅनलवरील वकीलांना बंधनकारक राहील.

९. ज्या दाव्यांमध्ये दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या वतीने वकील म्हणून काम पाहत आहेत किंवा सल्ला देत आहेत अशा दाव्यातील अन्य पक्षकारास त्यांना सल्ला देता येणार नाही, अथवा अशा पक्षकाराची दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना विरुद्ध असलेली प्रकरणे/दावे/खटले स्वीकारता येणार नाहीत.

१०. दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या पॅनलवरील वकीलांना वर्ग केलेल्या दाव्यांमध्ये पारित झालेले अंतरिम आदेश/निर्णय / हुकुम / सद्यस्थिती हे वेळोवेळी दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या नोडल ऑफिसर यांना कळविणे बंधनकारक राहील, तसेच दाव्यातील अंतरिम आदेश, स्थगिती आदेश, निर्णय हुकुम, सद्यस्थिती व इतर कागदपत्रे विधी विभागास वेळोवेळी उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

११. दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्यातर्फे वर्ग करणेत आलेल्या दाव्यांची सद्यस्थिती (सुनावणीच्या तारखा तसेच आदेश पारित असल्यास) प्रत्येक महिन्याच्या शेवटी अहवाल स्वरूपी दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेला उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

११. दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या पॅनलवर निवड झालेल्या वकीलांची नेमणूक प्रारंभिक काळ तीन वर्षाकरिता असेल आणि त्यांना वर्ग करणेत आलेल्या प्रकरणे/दावे/खटले मधील समाधानकारक कामगिरी असेल तर त्याचा पुढील कालावधी वाढविणेबाबत विचारात घेण्यात येईल.

१२. पॅनलवरील वकीलांना वर्ग करणेत आलेल्या प्रकरणे/दावे/खटले मधील त्यांच्या कामगिरीनुसार त्यांची नेमणूक कोणत्याही वेळेस संपुष्टात येण्यास पात्र राहील व याबाबत मा. मुख्य परिचालन अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

१३. पॅनलवरील वकीलानी दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनाच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांचा निकाल लवकरात लवकर लागणेसाठी आवश्यक पूर्ण प्रयत्न करणे तसेच विहित कालावधीत दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेची बाजू वेळीच व पूर्ण सामर्थ्याने माडून दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनाच्या बाजूने निकाल लागण्यासाठी प्रयत्न करणे बंधनकारक राहील. दाव्यासंबंधी साप्ताहिक अहवाल सादर करणे आवश्यक राहील..

१४. पॅनलवरील वकीलाना वर्ग करणेत आलेली प्रकरणे/कामे ही त्यांना उचित/योग्य कारणाव्यतिरिक्त नाकारता येणार नाहीत. वकीलाना वर्ग करणेत आलेले काम उचितायोग्य कारणास्तव करण्याचे नाकारल्यास सदर वकीलाची पॅनलवरील नेमणूक रद्द होणेस पात्र राहील.

१५.पॅनलवरील वकीलाना दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या मंजूर केलेले व्यवसायिक शुल्काचे दर हे सर्व शासकीय करासहीत असून प्रचलित शासन धोरणानुसार बजावटीस पात्र राहतील.

१६. पॅनलवरील वकीलांना त्यांच्या व्यवसायिक शुल्काची देयके दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्यातर्फे मंजूर दरानुसार अदा करण्यात येतील.

१७. पॅनलवरील वकीलानी व्यवसायिक शुल्काच्या देयाकासोबत दाव्यातील रोजनामा वकालतनामा, नेमणूक आदेश, कॅव्हेट प्रत प्रतिज्ञापत्र व वेळोवेळी झालेल्या न्यायालयीन आदेशाच्या प्रती सोबत जोडणे आवश्यक राहील.

१८. न्यायालयात दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्यातर्फे दावा अथवा न्यायालयात दाखल करणार असलेल्या लेखी कैफियत, जबाब, प्रतिज्ञापत्र यांचा मसुदा दाखल करावयाच्या तारखेच्या किमान पाच दिवस अगोदर कळविणे आवश्यक राहील.

१९. पॅनलवरील वकीलांनी त्यांची नेमणूक संपुष्टात आल्यास / रद्द झाल्यास त्यांना वर्ग करण्यात आलेली दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेची प्रकरणे/दादे/खटले/ याचिका व संबंधित दस्तऐवज तातडीने दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेस सुपूर्द करणे बंधनकारक राहील.

२०. पॅनलवरील वकीलांनी न्यायप्रविष्ठ दाव्यासंदर्भात दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या वतीने केलेल्या प्रयत्नांची शहानिशा व विश्लेषणाबाबत निर्णय घेणेस पुढील अधिकार मा. मुख्य परिचालन अधिकारी यांस राहतील.

२१. पॅनल वकीलानी दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या संबंधित दावे/ याचिका/खटले हाताळणेकरीता दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेने तयार केलेली DDUGKY-MAHA खटला व्यवस्थापन प्रणाली या संगणक आज्ञावलीचा वापर करून माहिती अद्यावत करणे आवश्यक राहील.

२२. पॅनलसाठी निवड प्रक्रियेत रितसर सहभागी होणाऱ्या वकीलांचाच पॅनलसाठी विचार करण्यात येईल.

२३. वरील नमूद केलेल्या दरसूची व्यतिरिक्त इतर कोणतेही शुल्क लागू राहणार नाहीत.

सही/-
मुख्य परिचालन अधिकारी
दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना

वरीलप्रमाणे मी. .... न्यायालयातील न्यायालयीन कामकाजाचे दर व अटी शर्ती मान्य असून त्याप्रमाणे मी काम करणेस तयार आहे.

(वकीलाचे/ संस्थेचे नाव सही व शिक्का)

दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना

विधी विभाग

दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या विधी पॅनलवर आवश्यकतेप्रमाणे वकील व सिनियर काऊंसिल यांची तीन वर्षाकरीता नेमणूक करणेबाबत तसेच वकील व सिनियर काऊंसिल यांना न्यायालय / न्यायाधिकरण निहाय मंजूर असलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई

अ. क्र.	दाव्यांचे प्रकार / कामाचे टप्पे	मंजूर दर (रुपये)
१.	दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या विरुद्ध याचिका/अपील जनहित याचिका मध्ये शपथपत्र दाखल करणेकरीता	
	कनिष्ठ वकील	एकूण रक्कम रुपये १५,०००/-
	वरीष्ठ वकील	एकूण रक्कम रुपये २५,०००/-
	सिनियर काऊंसिल एखाध्या प्रकरणाच्या गाभिर्याप्रमाने दरामध्ये वाटाघाटी करून चढ-उतार करण्याचे अधिकार मा. मुख्य परिचालन अधिकारी यांचेकडे राखीव असतील)	१,००,०००/-
२.	दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या वतीने याचिका/अपील दाखल/ / जनहित याचिका करणेकरीता	
	कनिष्ठ वकील	एकूण रक्कम रुपये २०,०००/-
	वरीष्ठ वकील	एकूण रक्कम रुपये ३०,०००/-
	सिनियर काऊंसिल एखाध्या प्रकरणाच्या गाभिर्याप्रमाने दरामध्ये वाटाघाटी करून चढ-उतार करण्याचे अधिकार मा. मुख्य परिचालन अधिकारी यांचेकडे राखीव असतील)	१,००,०००/-
३	दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्यामार्फत सिव्हील अॅप्लीकेशन दाखल केल्यास अंतिम निर्णयानंतर	एकूण रक्कम रुपये १०,०००/-
४	दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्याविरुद्ध दाखल होणारे सिव्हील अॅप्लीकेशन (For Interim Relief)	एकूण रक्कम रुपये ५,०००/-
५	न्यायालयीन प्रकरणांमध्ये साक्षांकित प्रती काढणेकरीता	एकूण रक्कम रुपये १,०००/-
६	केव्हॅट (Caveat) दाखल करणेकरीता	एकूण रक्कम रुपये ५,०००/-

७	लीगल नोटीस तयार करून बजाविण्या करिता	एकूण रक्कम रुपये ३,०००/-
८	साधी मायनर नोटीस तयार करून बजाविण्या करिता	एकूण रक्कम रुपये २,०००/-
९	अभिप्राय व कायदेशीर सल्ला देण्याकरिता	एकूण रक्कम रुपये ५,०००/-
१०	**करारनामा** १. करारानुसार मसुदा तयार करून देण्याकरिता २. कराराचे परीक्षण करून देण्याकरिता	एकूण रक्कम रुपये ५,०००/- एकूण रक्कम रुपये ३,०००/-
११	मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली कनिष्ठ व वरिष्ठ वकील व सिनियर काऊंसिल यांस एखाध्या प्रकरणाच्या गाभिर्याप्रमाने दरामध्ये वाटाघाटी करून/ कोटेशन इ. प्रमाणे अंतिम दर करण्याचे अधिकार मा. मुख्य परिचालन अधिकारी यांचेकडे राखीव असतील)	

<u>मा. कामगार न्यायालय</u>

अ. क्र.	दाव्यांचे प्रकार / कामाचे टप्पे	मंजूर दर (रुपये)
१	कॅव्हेट (Caveat) दाखल करणेकरीता	एकूण रक्कम रुपये २,०००/-
२	न्यायालयीन दावे	एकूण रक्कम रुपये ८,०००/-

<u>मा. औद्योगिक न्यायालय</u>

अ. क्र.	दाव्यांचे प्रकार / कामाचे टप्पे	मंजूर दर (रुपये)
१	कॅव्हेट (Caveat) दाखल करणेकरीता	एकूण रक्कम रुपये २,०००/-
२	न्यायालयीन दावे	एकूण रक्कम रुपये ८,०००/-

<u>मा.न्यायाधिकरण / मा. आयोग</u>

अ. क्र.	दाव्यांचे प्रकार	कामाचे टप्पे	मंजूर दर (रुपये)
१ .	Human rights commission	निकाललागले नंतर देय	१५,०००/-

मा.न्यायाधिकरणे (TRIBUNALS)

अ. क्र.	दाव्यांचे प्रकार	कामाचे टप्पे	मंजूर दर (रुपये)
१.	NCLT (National Company Law Tribunal)	निकाललागले नंतर देय	२५,०००/-
२.	MAT (Maharashtra Administrative Tribunal)	निकाललागले नंतर देय	१५,०००/-

मा. लवाद न्यायाधिकरण (ARBITRATION TRIBUNAL)

अ.क्र.	दाव्यांचे प्रकार	मंजूर दर (रुपये)
१.	दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या वतीने शपथपत्र/प्रतिज्ञापत्रालेखी जबाब/पुरावे दस्तऐवज इत्यादी दाखल करणेकरीता	एकूण रक्कम रुपये १५,०००/-
२.	प्रत्येक सुनावणीस हजर राहणेकरीता	एकूण रक्कम रुपये १५,०००/-

मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय

अ. क्र.	दाव्यांचे प्रकार	दाव्याचा टप्पा	टप्पानिहाय अदा करावयाची फी (रुपये)	दाव्या बद्दलची एकूण फी (रुपये)
१.	दिवाणी न्यायालयात दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या विरुद्ध दाखल दावे	१ वकालतनामा दाखल करणे (Filling of VP) २. लेखी विधान दाखल करणे (Filling of W.S.) ३. निशाणी ५ युक्तिवाद व आदेश ४.सुनावणी (Hearing) ५. अंतिम युक्तिवाद व आदेश/निर्णय / हुकुम (Final argument followed by order/ judgment/decree)	२०००/- २०००/- १५००/- ४५००/- २०००/-	एकूण १२०००/-

२.	न्यायालयात दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या वतीने किंवा दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या विरुद्ध अपील दाखल झाल्यास	१.वकालतनामा दाखल करणे (Filling of VP) २. अंतिम युक्तिवाद व आदेश/निर्णय / हुकुम (Final argument followed by order/ judgment/decree)	४०००/- ६०००/-	एकूण रक्कम १००००/-
३.	दिवाणी न्यायालयात अपील			एकूण रक्कम ८०००/-
४.	न्यायालयीन आदेशाच्या अंमलबजावणी संबंधित दावे			एकूण रक्कम २०००/-
५.	केव्हेट दाखल करण्याकरिता			एकूण रक्कम ८०००/-
६	फौजदारी खटले १. Summons Case २. Warrant Case ३. Summery Case	1.वकालतनामा दाखल करणे (Filling of VP) २.प्रतिवादीने केलेले बचावाचे विधान (Plea/Charge) ३.सुनावणी (Hearing) ४.अंतिम युक्तिवाद ५.निर्णय	२०००/- २०००/- २०००/- २०००/- २०००/-	एकूण रक्कम १०,०००/-
७	Miscellaneous Application (civil/Criminal)	1. वकालतनामा दाखल करणे (Filling of VP) 2. युक्तिवाद/ आदेश (Argument followed by order)	३०००/- ३०००/-	एकूण रक्कम ६०००/-
८	करारनामा 1. करारानुसार मसुदा तयार करून देणेकरीता 2. कराराचे परीक्षण करून			एकूण रक्कम ३०००/- एकूण रक्कम २०००/-
९.	अभिप्राय व कायदेशीर सल्ला देणेकरीता			एकूण रक्कम २०००/-
१०.	Cases pertaining to Courts beyond Thane,			एकूण रक्कम १२,०००/-

	Raigad, Mumbai Jurisdiction			
११.	लोक आयुक्त न्यायालय			एकूण रक्कम ५,०००/-
१२.	न्यायालयीन प्रकरणामध्ये साक्षांकित प्रती काढणे			एकूण रक्कम ५००/-
१३.	लीगल नोटीस तयार करून बजावणेकरीता			एकूण रक्कम १५००/-
१४.	साधी मायनर नोटीस तयार करून बजावणेकरीता			एकूण रक्कम १०००/-

अर्जाचा नमुना (APPLICATION FORM)

दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या विधी पॅनलवरील “वकील” ☐ /“वरिष्ठ विधिज्ञ” ☐ नियुक्तीसाठी अर्ज (FOR EMPANELMENT AS “ADVOCATE” ☐ /“SR.COUNSEL” ☐ ON LAW PANEL OF DDUGKY)

प्रति,

मा. मुख्य परिचालन अधिकारी साहेब,
दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना,
राज्य व्यवस्थापन कक्ष, तळ मजला,
ग्राम विकास भवन,सेक्टर -२१,
खारघर, नवी मुंबई -410210.

Affix Photograph

1.संपूर्ण नाव मराठी व इंग्रजी (FULL NAME IN ENGLISH)

संपूर्ण नाव	मराठी	ENGLISH (IN CAPITALS)
आडनाव (SURNAME)		
स्वतःचे नाव (NAME)		
वडिलांचे/पतीचे नाव (FATHER/ SPOUSE)		
आईचे नाव (MOTHER)		

2. रहिवासी पत्ता (RESIDENTIAL ADDRESS)

मराठी	ENGLISH (IN CAPITALS)
.... पिन कोड	.... PIN CODE ....

3.कार्यालयाचा पत्ता (OFFICE ADDRESS)

मराठी	ENGLISH (IN CAPITALS)
.... पिन कोड	.... PIN CODE ....

4. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (ADDRESS FOR COMMUNICATION)

मराठी	ENGLISH (IN CAPITALS)
.... पिन कोड	.... PIN CODE ....

5. संपर्क/ दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक (CONTACT NO): ....

6. ई-मेल (E-MAIL) : ....

7. जन्म दिनांक (DATE OF BIRTH) : ....

8. बार काउंसिल नोंदणी क्रमांक (BAR COUNCIL OF REGISTRATION No.):..............................

9.शैक्षणिक अहर्ता (EDUCATIONAL QUALIFICATIONS) :

अ. क्र Sr.No	**उत्तीर्ण झालेली परीक्षा** Examination Passed	**विद्यापीठ / मंडळाचे नाव** University/ Board	**उत्तीर्ण वर्ष** Passing Year	**टक्केवारी / श्रेणी** Percentage/ Grade
1.				
2.				
3.				
4.				
5.				
6.				

10. कामाचा अनुभव (WORK EXPERIENCE) :

अ. क्र Sr.No	**संस्थेचे नाव व पत्ता** Name & Address of the firm	कालावधी (Duration)		एकूण अनुभव Total Experience
		पासून (From)	पर्यंत (To)	
1.				
2.				
3.				
4.				
५.				

11.अर्जासोबत खालील कागदपत्राच्या छायांकित सत्यप्रती जोडलेल्या आहेत (Following Xerox True Copies are attached)

(१) शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र व गुणपत्रिका (Educational Qualification Certificates and Marksheet) ☐

(२) बार काउंसिल नोंदणी प्रमाणपत्र,ओळखपत्र, सनद (BAR Council registration certificate, ID, Sanad) ☐

(३) शाळा सोडल्याचा दाखला /जन्म प्रमाणपत्र (School Leaving Certificate / Birth Certificate) ☐

(४) पॅन कार्ड व आधार कार्ड (PAN Card and ADHAAR Card) ☐

(५) दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेने मंजूर केलेले दरसूची व अटी शर्ती मान्य असलेबाबत त्याखाली संमती दर्शवणारी स्वाक्षरी (Acceptance Signature showing consent for terms & conditions and rates fixed by Municipal Corporation) ☐

(६) कामाच्या अनभुवाचा दाखला (Work Experience Certificate) ☐

(७) इतर कागदपत्र (असल्यास कृपया उल्लेख करावा Other Documents (if any) kindly specify

....

....

१२. राष्ट्रीयत्व(NATIONALITY):..

१३. अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय? (IS APPLICANT DOMICILED IN MAHARASHTRA?) होय / नाही

१४. दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या विधी पॅनलवरील वकील/ सीनियर काऊंसिल म्हणून खालीलपैकी कोणत्या न्यायालय / न्यायाधिकरण करीता अर्ज दाखल करीत आहात? (कृपया खालीलपैकी कोणतेही एक कोणत्या न्यायालय / न्यायाधिकरण निवडणे)

"वकील" ☐ / "वरिष्ठ विधिज्ञ" ☐

- मा. सर्वोच्य न्यायालय ☐
- मा. उच्च न्यायालय ☐
- NCLT (National Company Law Tribunal) ☐
- मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, मुंबई ☐

[टीप : कृपया जे लागू नसेल त्यावर काट मारावी (Strike out whichever is not applicable)]

मी असे प्रमाणित करतो की, वर नमूद केलेली सर्व माहिती ही माझ्या माहिती समजुतीनुसार सत्य व बरोबर असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा तद्द नंतर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन याची मला जाणीव व कल्पना आहे.

This is to certify that; abovementioned details are true and correct to the best of my knowledge & belief. I am fully aware that, in the event if found false or incorrect, my nomination liable to be cancelled at any stage of selection or thereafter and I will be liable for legal action.

ठिकाण :- अर्जदारची स्वाक्षरी ....

PLACE :- Signature ....

दिनांक :- नाव ....

DATE :- Name ....